खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

# विद्यार्थी विकास मंडळ

## अहवाल

सन २०२४-२५ मधील सत्र १ मध्ये साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाचे कामकाज प्रा. शिवम कदम यांनी स्वीकारले. विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून प्रा.एस.डी.कदम यांना २७ जुलै मान्यता मिळाली. सदर वर्ष २०२४-२५ मधील सत्र १ चे विद्यार्थी कल्याण मंडळाचे नियोजित कार्यक्रम सर्वांच्या सहभागाने संपन्न झाले. विद्यार्थी विकास मंडळाच्या विद्यमानाने खालील उपक्रम राबविण्यात आले होते. तसेच काही महत्वाच्या कार्यवाही देखील पार पाडण्यात आल्या त्यासंबंधी अहवाल खालील प्रमाणे आहे.

महाविद्यालयात " कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका " योजना शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये सुरू करण्यासाठी विद्यापीठ Online Portal वर प्रस्ताव पाठवण्यात आला. या प्रस्तावाला दिनांक २२ जुलै २०२४ रोजी मान्यता देण्यात आली व सदर योजना १ सप्टेंबर २०२४ पासून महाविद्यालयामध्ये राबवण्यास सुरुवात झाली. या योजने मध्ये एकूण 16 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. 30 जुलै २०२४ रोजी पुणे विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थी कल्याण अधिकारी वार्षिक नियोजन कार्यशाळेमध्ये उपस्थित राहुन वर्षभरात करण्यात येणाऱ्या विद्यार्थी विकास मंडळाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजने संदर्भात महाविद्यालयामध्ये Anti Ragging Commission ची स्थापना करण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंग प्रतिबंधात्मक उपायोजना संदर्भात जागृकता करण्यासाठी १२/०८/२०२४ रोजी महाविद्यालयामध्ये UGC - (विद्यापीठ अनुदान आयोग) निर्देशित

" रॅगिंग प्रतिबंधात्मक जनजागृती सप्ताह " या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रॅगिंग प्रतिबंधात्मक संदर्भात माहिती देऊन विद्यार्थी जागृती करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या पोर्टलवर रॅगिंग प्रतिबंधात्मक संदर्भात उपलब्ध करून दिलेला लघु -चित्रपट दाखवण्यात आला. सदर उपक्रमामध्ये एकूण ७४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या दरम्यान विश्वविद्यालय अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या निर्देशनानुसार आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मागील वर्षी प्रमाणे या हि वर्षी हर घर तिरंगा ही मोहीम आयोजित करण्यात आली. सदर उपक्रमामध्ये महाविद्यालयातील ३९६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

विद्यापीठाच्या निर्देशनानुसार महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक समन्वयक म्हणून प्रा.हर्षदा कोळी यांची नेमणूक करण्यात आली. व सदर माहिती SDO Online Portal वर नोंदवण्यात आली.

महाविद्यालयामध्ये सर्व जाती - धर्मातील विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी " समान संधी " कक्षाची स्थापना करण्यात आली.

दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमानाने प्रा.रामकृष्ण मोरे कला,वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज या ठिकाणी सांस्कृतिक आणि साहित्यिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सादर स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण 3 विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रथम फेरीत कु. आदेश कोळेकर या विद्यार्थ्याची प्रथम क्रमांकांनी विद्यापिठीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.

दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स याठिकाणी जल्लोष महोस्तवाचे आयोजन करण्यात आले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमात महाविद्यालयातील एकूण 3 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.  सदर विद्यार्थी भित्तिचित्रक स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धेत सहभागी झाले होते.

महाविद्यालयात “ निर्भय कन्या ” योजना शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये राबवण्यासाठी विद्यापीठ Online Portal वर प्रस्ताव पाठवण्यात आला. दिनांक 3 ऑक्टोबर २०२४ रोजी सदर योजना राबवण्यासाठी मान्यता देण्यात आली. सदर उपक्रम महाविद्यालयात राबविणे प्रस्तावित आहे.

या सर्व उपक्रमाव्यतिरिक्त विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या आवश्यक सूचनांनुसार योग्य ती कार्यपूर्तता करण्यात आली. म्हणजेच विद्यापीठाकडून ऑनलाईन स्वरूपामध्ये वेळोवेळी माहिती मागविण्यात आलेली होती. त्यासंबंधीचे कामकाज देखील व्यवस्थितरीत्या पार पडले.

सदर सत्रामध्ये परिपूर्ण झालेले सर्वच उपक्रम हे विद्यार्थी कल्याण मंडळाचे मुख्य ध्येय म्हणजेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण आणि परिपूर्ण विकास यास अनुसरूनच झाले. दिव्तीय सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा असल्याकारणाने कमावा आणि शिका योजना जानेवारी महिनापासून सुरु करण्यात आली.

दिनांक २४/०२/२०२५ रोजी महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान राबवण्यात आले. सदर अभियान महाविद्यालयात प्रथमच राबविले असून या अभियानाला १५९ विद्यार्थिनी आणि ९ प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.शिवम कदम यांनी केले तर आभार प्रा.जी.जी.आहेरकर यांनी मांडले.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळांतर्गत मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा.साईनाथ पाचारणे यांना आमंत्रित करण्यात आले होते.

तसेच विद्यापीठांनी सूचित केलेले वेगवेगळे उपक्रम महाविद्यालयाने राबवले असून विविध परिपत्रकांची अंमलबजावणी केली आहे. तसेच विशेष महत्वाची बाब म्हणजे महाविद्यालयाने शून्य कचरा नियोजनासंदर्भात योजनाची आखणी करून त्या अनुषंगाने पाऊले उचलली आहे. जसे की, विविध कार्यक्रमा मध्ये प्लास्टिक बॉटल चा वापर न करता तांब्या व फुलपात्राचा वापर करणे. चहा पिताना प्लास्टिक कप टाळून काचेचा ग्लास वापरणे. पर्यावरणाचा प्रकल्प करताना प्लास्टिक फाईल चा वापर टाळून कागदी कवर चा उपयोग करणे.

प्रत्येक उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे सर ,प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी मोलाचे सहकार्य केले व विद्यार्थ्यांच्या सहकाऱ्यामुळे सर्व उपक्रम यशस्वी होण्यास मदत झाली. 'पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान, ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान." या काव्यपंक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर कर्मशील

करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अखंड प्रयत्नशील असते. आणि महाविद्यालाच्या विद्यार्थी विकास मंडळाने हेच पर्यंत अखंडपणे करण्याचे योजले आहे. अश्या रीतीने विद्यार्थी विकास मंडळाने वर्षभरात कामकाज व उपक्रम यशस्वीरित्या संपन्न केले.

प्रा.एस.डी.कदम
विद्यार्थी कल्याण अधिकारी
साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

वरील राबवण्यात आलेल्या उपक्रमाचे फोटो खालील प्रमाणे :-




**कमवा आणि शिका योजना**




**रॅगिंग प्रतिबंधात्मक जनजागृती सप्ताह**

**हर घर तिरंगा अभियान**







**जल्लोष महोत्सव**




**साहित्यिक व सांस्कृतिक स्पर्धा**








# निर्भय कन्या अभियान




## कमवा आणि शिका योजनेची अंमलबजावणी